बुलढाणा/परभणी/अकोला/वाशिम/जालना/संभाजीनगर/जालना/बीड/नाशिक/पुणे/ठाणे/मुंबई/यवतमाळ/अमरावती.

RNI - MAHMAR/२०२२/८७८८४

शुक्रवार दि. २४ एप्रिल २०२६

दैनिक सेवाशक्ती टाईम्स

आपल्या हक्काचे दैनिक

https://www.sewashaktitimes.com | मुख्य संपादक - अंकोश जानु राठोड - 9011509831 | कार्यकारी संपादक - गजानन सरकटे - 8605433822 | E-mail: ankoshrathod25@gmail.com

● वर्ष-३ रे ● अंक ३८७ ● पाने-४ ● किंमत -२ रुपये

# १ लाख ९५० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त

## पिंजर पोलिसांची धडक कारवाई, वडगाव फाट्याजवळील घटना

**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
प्रदिप गावंडे

**बार्शीटाकळी :** जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत पिंजर पोलीस स्टेशनच्या पथकाने वडगाव फाट्याजवळ मोठी धडक कारवाई करत प्रतिबंधित गुटख्याचा साठा जप्त केला. या कारवाईत सुमारे १ लाख ९५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून संबंधित व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.ङ्ङपोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पिंजर येथील शेख शेरू शेख सुभान याच्याकडे प्रतिबंधित सुगंधी तंबाखू व गुटखा साठा असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथकाने सापळा रचून वडगाव फाट्याजवळ त्याची झडती घेतली असता विविध कंपन्यांचा मोठ्या प्रमाणात गुटखा व सुगंधी तंबाखू आढळून आला. सदर साठा हा शासनाने प्रतिबंधित केलेल्या पदार्थांमध्ये मोडत असल्याने तात्काळ जप्त करण्यात आला. या प्रकरणी संबंधिताविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके अधिनियम तसेच इतर लागू कायद्यांनुसार गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास पिंजर पोलीस करीत आहेत. जिल्ह्यात गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर बंदी असतानाही अशा प्रकारे अवैध साठा ठेवणे हा गंभीर गुन्हा मानला जातो. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पिंजर पोलीस स्टेशनचे ठाणेदार गंगाधर दराडे यांच्या नेतृत्वाखाली पीएसआय अभिषेक नवघरे, नागसेन वानखडे, पंकज एकाडे, भागवत गांजवे, वाहन चालक नागेश दांडी यांनी ही कारवाई यशस्वीरीत्या अंजाम दिली. तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी रवींद्र द्वारकदास सोळंके व अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनीही या कारवाईत महत्त्वाची भूमिका बजावली. या धडक कारवाईमुळे परिसरातील अवैध गुटखा व्यवसायावर मोठा आळा बसणार असल्याचे नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे. पोलीस प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अशा प्रकारच्या अवैध धंद्यांची माहिती त्वरित पोलिसांना द्यावी, जेणेकरून समाजहिताच्या दृष्टीने कठोर कारवाई करता येईल.



## तहसील कर्मचारी संपावर,शालेय कामासह इतर कामे रखडली



**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
समाधान सरकटे

**साखरखेर्डा :** सिंदखेडराजा तहसिल मधील कर्मचारी गेल्या चार दिवसांपासून संपावर गेल्याने अनेक कामे रखडली आहेत . ११ वी ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करताना कागद पत्रांची पुर्तता होत नसल्याने पालक वर्गात नाराजीचा सूर उमटत आहे . ङ्महाराष्ट्रातील सर्व महसूल कर्मचारी २० एप्रिल पासून आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी संपावर गेले आहेत . सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करावी. या मागणीसह अनेक मागण्या त्यांनी शासनाकडे केल्या आहेत. या अगोदर सुध्दा त्यांनी मागणी संदर्भात आंदोलन केले होते. शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला होता. परंतू त्यावर कोणतीही कार्यवाही केली नाही. प्रलंबित मागण्या मान्य करण्यासाठी पुन्हा तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला. २० एप्रिल पासून सिंदखेडराजा तालुक्यातील महसूल संघटनेचे अध्यक्ष संजय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कर्मचारी संपावर गेले आहेत. कामबंद आंदोलन सुरु केल्याने सिंदखेडराजा तालुक्यातील सर्वच विद्यार्थ्यांना उत्पन्न दाखला , नॉन क्रिमीलेयर, जातीचा दाखला मिळणे दुरापास्त झाले आहे. केंद्रीय शिक्षण प्रणाली नुसार १० मधील विद्यार्थ्यांना ११ वी मध्ये प्रवेश अर्ज सादर करण्याची ३० एप्रिल ही तारीख देण्यात आली आहे. परंतू कागद पत्रांची जुळवाजुळव करताना अडचणी येत आहेत. तरी शासनाने कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावा, आणि महसूल कर्मचाऱ्यांना पुर्ववत कामावर रुजू होण्याचे आदेश द्यावेत. संजय सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली आर आर कहाळे , एस डी बंगाळे, एस बी रोकडे, व्ही जे पडघान, के जी इंगोले, श्रीकृष्ण शिंगणे, एस बी अंभोरे यांच्यासह अनेक कर्मचारी संपात सहभागी झाले आहेत .

## प्रत्येकाने कोणत्याही पुस्तकाचे वाचन केले पाहिजे-नितीन जाधव गोगलगावकर

**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
अहमद अन्सारी

**परभणी :** राष्ट्र जन फाउंडेशन परभणी च्या वतीने जागतिक आंतरराष्ट्रीय पुस्तक दिनानिमित्त पुस्तकाचे वाचन ग्रंथाचे वाचन पुस्तकाचे पूजन दिनांक २३ एप्रिल २०२६ रोजी रामकृष्ण नगर येथे पुस्तकाचे पूजन व वाचन करण्यात आली. याप्रसंगी राष्ट्र जन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी प्रत्येक व्यक्तीने वाचनाचा छंद जपला पाहिजे कोणताही मंग दैनिक पेपर असो जनरल नॉलेजचे पुस्तक असो स्पर्धा परीक्षा पुस्तक असो किंवा महापुरुषांचे ग्रंथ हरिपाठ असे कोणतेही पुस्तकांचे वाचन केले पाहिजे कारण वाचन केल्याने मन शांत राहते आणि आपल्याला ज्ञान मिळते आज ज्ञान असेल तरच काही जीवनात खरा आहे म्हणून प्रत्येकाने कोणत्याही पुस्तकाचे किंवा ग्रंथाचे वाचन हे काळाची गरज आहे समजून जसे इतर दिन असतात तसाच जागतिक पुस्तक



दिन २३ एप्रिलला साजरे केले जाते म्हणून वर्षातून एकदा का होईना दररोजनीतीने माने वाचाल तर वाचाल म्हणून पुस्तक वाचा किंवा माथा ठीक राहतो वाचन हेच खरे ज्ञान होय असे आव्हान गौरक्षक सेना मराठवाड्याचे अध्यक्ष गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांच्यावतीने सोशल मीडियाच्या माध्यमातून आव्हान करण्यात आले यावेळी विद्यार्थी रुद्राक्ष आवटे उपस्थित होते अशी माहिती वीर वारकरी सेवा संघ चे प्रदेशाध्यक्ष गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकाद्वारे माहिती दिली

# पोयसर आगारात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
वृत्तसंकलन

**कांदिवली :** कांदिवली (मुंबई) पोयसर आगार येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त २१ एप्रिल रोजी भव्य व उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी आणि उत्साहाच्या वातावरणात हा जयंती सोहळा मोठ्या जल्लोषात पार पडला.ङ्गया कार्यक्रमास लोणारमेहकर मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ रामभाऊ खरात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आपल्या भाषणात त्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे अनुसरण केल्यास समाज आणि व्यक्तीची सर्वांगीण प्रगती निश्चित होते, असे प्रतिपादन केले. तसेच एसटीतील चालक, वाहक आणि कर्मचाऱ्यांच्या समस्या विधानभवनात मांडण्याचे आश्वासन त्यांनी दिले. कार्यक्रमात गायक दिनकर शिंदे यांच्या सुमधुर गायनाने रंगत आणली. बुद्ध धम्म गीतांनी वातावरण भारावून गेले. विशेष आकर्षण म्हणून आमदार खरात यांनीही ''चांदण्याची काया'' हे गीत सादर करत उपस्थितांची मने जिंकली. यावेळी आमदार खरात यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच प्रा. कुंदन खरात, दिलीप भालेराव, विनोद रत्नपारखे यांचाही यथोचित सन्मान करण्यात आला. कार्यक्रमासाठी आमदारांनी १० हजार रुपयांची मदत जाहीर करून सामाजिक उपक्रमाला पाठबळ दिले.ङ्गसंयुक्त जयंती समितीचे अध्यक्ष उज्वल भिसे, सचिव प्रदीप गवई, खजिनदार नागेश यादव यांच्यासह राकेश धोत्रे, परमेश्वर गायकवाड, विजय ससाने, भीमराव पवार, नरेश जाधव, गौतम जोगदंड तसेच आगारातील सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. कार्यक्रमाची सांगता स्नेहभोजनाने करण्यात आली.

# श्री गौरक्षण संस्थानच्या मदतीने गोमातेला निवारा



**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
भारत चव्हाण

**सारकिन्ही :** जय सेवालाल गौरक्षण संस्थान जनुना तालुका बार्शीटाकळी जिल्हा अकोला. येथे जागेचे स्थलांतर करण्यात आले. संस्थेची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची बिकट असल्यामुळे आणि गोशाळेमध्ये क्षमतेपेक्षा जास्त गोवंश गोमाता असल्यामुळे गोमातेचा निवारा लहान पडत होता गोमातेची निवाऱ्याची व्यवस्था पाहून श्री गौरक्षण संस्थांचे संस्थापक अध्यक्ष यांनी मागील चार ते पाच पिढ्यांपासून गोमातेची गोवंशाची मनोभावे प्रामाणिकपणे निष्ठेने सेवा केली असे गो भक्त गोसेवा यांनी जय सेवालाल गौरक्षण संस्थांची चारापाणी आणि निवाऱ्याची व्यवस्थेची बातमी महाराष्ट्रातील लोकप्रिय दैनिक मध्ये प्रकाशित झाल्यामुळे आणि स्वच्छ गोभक्तांपर्यंत ही बातमी पाहून स्वयंस्फूर्तीने गोशाळेचे परिस्थिती प्रत्यक्ष पाहून व शाळेला खरंच एका निवाऱ्यांची आवश्यकता आहे. म्हणून सदर गोशाळेला ३० बाय १४० फुटांचं मजबूत चिरकाल टिकेल अशा पद्धतीचं लोखंडी टिन शेड .श्री गौरक्षण संस्थांनी संपूर्ण बांधकामाश बांधून दिल्यामुळे व गो संवर्धन निवाऱ्यांची कायमस्वरूपी व्यवस्था करून दिली. यापूर्वी लहान वासराना गर्दीत चेंगरा चेंगरी होत होते आता.गोमाता गोवंशाला एक आगळा वेगळा सुख आनंद कोणत्याही प्रकारची दुखापत जनावरांना होणार नाही याची काळजी घेतली. एकमेकांना इजा होणार नाही. अशा पद्धतीची व्यवस्था श्री गौरक्षण संस्थाननी कायमस्वरूपी उपलब्ध करून दिल्या मुळे केल्यामुळे संस्थेच्या वतीने तथा तमाम पंचक्रोशीतील जनतेच्या वतीने त्यांचे धन्यवाद आणि मनापासून आभार संस्थेचे सर्व संचालक संस्थापक अध्यक्ष यांनी आभार मानले.

# प्रभावी डास नियंत्रण उपायांची गरज-डॉ. नामदेव पाटील पोटे

**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
दिपक जैस्वाल

**भोकरदन :** तालुक्यातील भोकरदन शहरातील तालुका आरोग्य अधिकारी यांच्या अंर्तगत येणारे सर्व प्रथिमिक आरोग्य केंऊ दरवर्षी जगभरात जागतिक मलेरिया दिन २५ एप्रिल रोजी साजरा केला जातो. मलेरिया आजराबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी या दिवशी अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. ज्याचा उद्देश लोकांना या गंभीर आजाराबद्दल जागरूक करणे आणि त्याच्या प्रतिबंधासाठी प्रयत्नांना प्रोत्साहन देणे आहे. दिनाची संकल्पना : जागतिक मलेरिया दिन २०२६ ची संकल्पना आहे मलेरियाविरुद्ध एकजूट. ही संकल्पना मलेरिया प्रतिबंध आणि नियंत्रणामध्ये सामूहिक कृतीचे महत्त्व अधोरेखित करते. ती सरकारे, आरोग्य सेवा संस्था, समुदाय आणि जागतिक भागीदार यांच्यातील सहकार्यावर भर देते. जनजागृतीचे प्रयत्न डास नियंत्रण, लवकर निदान आणि वेळेवर उपचार यांसारख्या प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक मजबूत करण्यावर लक्ष केंद्रित करतात. इतिहास आणि उद्देश २००१ मध्ये हा दिवस आफ्रिका मलेरिया दिन म्हणून साजरा करण्यात आला. डब्ल्यूएचओने याला जागतिक मलेरिया दिन असे नाव दिले. जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) २००७मध्ये हा दिवस सुरू केला, ज्याचा मुख्य



उद्देश मलेरियाच्या जागतिक समस्येकडे लक्ष वेधणे आणि त्याच्या प्रतिबंधासाठी आणि नियंत्रणासाठी उपाययोजना करणे हा आहे. मलेरिया हा आजार भागात प्रामुख्याने उष्णकटिबंधीय आणि उप-उष्णकटिबंधीय आढळतो, जिथे डासांचा प्रादुर्भाव जास्त असतो. ज्यामुळे या आजाराविरुद्ध लढा अधिक तीव्र करण्याची गरज आहे. मलेरियाची लक्षणे ताप आणि थंडी मलेरियाचे सर्वात सामान्य लक्षण म्हणजे थंडी वाजून येणे आणि उच्च ताप येणे. हा ताप अनेकदा सायकलमध्ये येतो, म्हणजे दर ४८ किवा ७२ तासांनी पुन्हा येतो.डोकेदुखी आणि अशक्तपणा रुग्णाला तीव्र डोकेदुखी, थकवा आणि शरीरात अशक्तपणा जाणवतो.**ॲननिमिया आणि कावीळ :** गंभीर प्रकरणांमध्ये लाल रक्तपेशींचा नाश झाल्याने ॲहनिमिया आणि कावीळ होऊ शकते.**मलेरिया रोखण्यासाठी उपाय:** मच्छरदाणीचा वापर रात्री झोपताना मच्छरदाणीचा वापर अवश्य करा. तसेच, विशेषतः मुलांसाठी डास प्रतिबंधक क्रीम किंवा स्प्रे वापरा.पाणी साचू देऊ नका: डास बहुतेकदा स्वच्छ आणि साचलेल्या पाण्यात प्रजनन करतात. म्हणून, भांडी, कूलर, टाक्या किंवा इतर उघड्या भांड्यांमध्ये पाणी साचू देऊ नका. आठवड्यातून एकदा स्वच्छ करा.ङ्गपरिसर स्वच्छ ठेवणे घराभोवती पाणी साठू देऊ नये, कारण डास हे अशा ठिकाणी अंडी घालतात. गटारे आणि डबकी स्वच्छ ठेवावीत.पूर्ण कपडे घाला संध्याकाळी बाहेर जाताना पूर्ण बाह्यांचा शर्ट आणि पूर्ण पँट घाला. डासांपासून स्वतः चे रक्षण करण्याचा हा एक सोपा मार्ग आहे. हे विशेषतः मुलांसाठी आणि वृद्धांसाठी महत्वाचे आहे.

दैनिक सेवाशक्ती टाईम्स, यह समाचार पत्र के मुद्रक राम प्रिंटिंग प्रेस तहसील चौक मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा प्रिंट करके प्रकाशक मालक अंकोश जानु राठोड द्वारा दैनिक सेवाशक्ती टाईम्स कार्यालय राजीव गांधी कॉम्प्लेक्स मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा, प्रकाशित किया दैनिक सेवाशक्ती टाईम्स प्रकाशक मालक संपादक अंकोश जानु राठोड यह पीआरबी अक्ट के तहत समाचार चयन के लिये संपादक सहमत है ऐसा नही, सभी विवाद मेहकर न्यायालय अंतर्गत संपादक अंकोश जानु राठोड मो, 9011509831 Title code :- MAHMAR52107 Dainik Sevashakti Times, Printer of this Newspaper Ram Printing Press Tehsil Chowk Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha, Printed and Published by Publisher Proprietor Ankosh Janu Rathod Dainik Sevashakti Times Office Rajiv Gandhi Complex Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha Dainik Sevashakti Times Publisher Proprietor Editor Ankosh Janu Rathod This editor agrees for selection of news under PRB Act No, all disputes under Mehkar Court Editor Ankosh Janu Rathod Mo, 9011509831
Title code :- MAHMAR52107

# विद्यार्थ्यांच्या सहभागातून स्वयंशासन दिन साजरा; मुख्याध्यापिका जरीना शेख यांना निरोप



**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
**रियाज शेख**

**मानवत :** जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा, शाखा क्रमांक १, मानवत येथे दि. २३ एप्रिल (गुरुवार) रोजी सकाळी १० वाजता इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वयंशासन दिन तसेच मुख्याध्यापिका जरीना शेख यांच्या निरोप समारंभाचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक मोहम्मद बदरोद्दीन सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाथरी येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक मुजीब अन्सारी सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक मोहम्मद बिलाल बागवान, डॉ. आहद बेलदार, डॉ. जुबेर खान यांची उपस्थिती लाभली. तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हाजी रफिक कुरेशी समाजसेवक मोहम्मद मुस्ताक, शगिर खान, मोहम्मद रफीक (पान शॉप), अब्दुल वहाब बागवान, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य शेख सिद्दीक, नदीम बेलदार, शेख वाहेद आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. त्यानंतर स्वयंशासन दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी शाळेतील विविध पदांची जबाबदारी स्वीकारत मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या भूमिका पार पाडल्या. विद्यार्थ्यांनी अत्यंत आत्मविश्वासाने व शिस्तबद्ध पद्धतीने शाळेचे दैनंदिन कामकाज सांभाळत आपली क्षमता सिद्ध केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, निर्णयक्षमता व जबाबदारीची जाणीव वाढीस लागल्याचे स्पष्ट झाले. यानंतर मुख्याध्यापिका जरीना शेख यांच्या निरोप समारंभाचा कार्यक्रम पार पडला. त्यांच्या सेवाकाळातील कार्याचा गौरव उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून केला. शाळेच्या शैक्षणिक प्रगतीसाठी त्यांनी केलेल्या योगदानाचा विशेष उल्लेख करण्यात आला. विद्यार्थ्यांनीही भावनिक वातावरणात आपल्या भावना व्यक्त करत त्यांना निरोप दिला. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत परिश्रम, शिस्त आणि चिकाटी या गुणांच्या आधारे जीवनात यश मिळवण्याचे मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात मुजीब अन्सारी सर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ऐहतेसार अन्सारी, रिजवानुद्दीन सर, बद्रुद्दीन सर, निखत मॅडम, अन्सारी इशरत फातेमा यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रिजवानुद्दीन सर यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन ऐहतेसार अन्सारी यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नगरसेवक मोहम्मद बिलाल बागवान यांची प्रतिक्रिया

जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा, शाखा क्रमांक १, मानवत येथे आयोजित स्वयंशासन दिन हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच जबाबदारीची जाणीव करून देणे ही काळाची गरज आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, शिस्त व आत्मविश्वास विकसित होतो. मुख्याध्यापिका जरीना शेख यांनी आपल्या सेवाकाळात शाळेच्या प्रगतीसाठी केलेले कार्य कौतुकास्पद असून त्यांचे योगदान सदैव स्मरणात राहील. त्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच नैतिक विकासासाठी दिलेले योगदान मोलाचे आहे. विद्यार्थ्यांनीही आजच्या कार्यक्रमात उत्तम सहभाग नोंदवत आपली क्षमता सिद्ध केली आहे. भविष्यातही असे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना सक्षम नागरिक बनवण्याचा प्रयत्न सुरू राहावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# भारतीय संस्कृती टिकवण्यासाठी व्यसन सोडा देव जोडा - हभप नामदेव गुरुजी मुरकुट

**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
**मुन्ना ठाकूर**

**देऊळगाव राजा :** 'देव वसे चित्ती त्यांची घडावी संगती' या अभंगाप्रमाणे हिंदू धर्मामध्ये ईश्वर नाम स्मरणामुळे जिवनाचे फलीत आहे. परंतु आजची तरुण पिढी ही व्यसनाधिनतेमुळे भारतीय संस्कृती जोपासत नसल्याचे चित्र सध्या दिसून येत असल्यामुळे आजच्या तरुणांनी व्यसन सोडा देव जोडा असा महत्वपूर्ण संदेश सुप्रसिद्ध कीर्तनकार हभप नामदेव गुरुजी मुरकुट यांनी आपल्या गोड अमृतवाणीतून डोरव्ही येथे कीर्तनातून दिला. आद्यगुरू शंकरचार्य यांच्या जयंती उत्सवानिमित्त अंखड हरिनाम साप्ताहचे आयोजन करण्यात आले होते. या अंखड हरिनाम सप्ताहमध्ये श्रीमद भागवत कथा, ग्रंथराज व ज्ञानेश्वरी पारायण घेऊन सप्ताह समाप्तीनंतर महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. या अंखड हरिनाम सप्ताहात कीर्तनकार हभप प्रकाश महाराज मुरकुट, हभप दिपालीताई शेळके, हभप अनिल महाराज चेके,



हभप ज्ञानेश्वर महाराज झगरे, हभप तुकाराम महाराज पारधी, प्रेमानंद महाराज देशमुख या कीर्तनकारांनी आपल्या गोड अमृतवाणीतुन सेवा दिली. तर काल्याचे कीर्तन महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार हभप डॉ. अनिरुद्ध क्षीरसागर यांचे काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची समाप्ती झाली. यावेळी डोरव्ही गावातील असंख्य महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

# समता चळवळीतील झुंजार नेतृत्व चक्रधर दादा उगले अनंतात विलीन

**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
**अहमद अन्सारी**

**पाथरी :** अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पश्चिम मराठवाडा विभागीय अध्यक्ष चक्रधर दादा उगले यांच्या अकाली निधनाने परभणी जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे. समता, सामाजिक न्याय आणि बहुजनांच्या हक्कांसाठी सातत्याने लढणारे एक झुंजार, निष्ठावान नेतृत्व हरपल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे. पाथरी तालुक्यातील सिमुरगव्हाण येथील रहिवासी असलेल्या उगले यांनी कोणताही राजकीय वारसा नसताना स्वतःच्या कर्तृत्वावर नेतृत्व उभे केले. सरपंच पदापासून सुरू झालेला त्यांचा प्रवास पंचायत समिती सभापती तसेच दोन वेळा जिल्हा परिषद सदस्य या जबाबदाऱ्यांपर्यंत पोहोचला. तळागाळातील प्रश्नांवर त्यांनी सातत्याने आवाज उठवत समाजकारणात वेगळी छाप पाडली.ङ्कमहात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीचा



ठसा त्यांच्या कार्यावर स्पष्टपणे दिसून येत होता. समता, न्याय आणि सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी बहुजन समाजासाठी उल्लेखनीय योगदान दिले. त्यांच्या कार्यामुळे तालुका व जिल्हा स्तरावर मोठा जनसंपर्क निर्माण झाला होता.ङ्कदरम्यान, पुणे येथील ग्लोबल हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरू असताना समता परिषदेचे अखिल भारतीय अध्यक्ष तथा कॅबिनेट मंत्री छगनराव भुजबळ यांनी भेट देऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली होती. मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.सिमुरगव्हाण येथील त्यांच्या फार्महाऊसवर अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार पार पडले. हजारोंच्या जनसमुदायाने अंत्ययात्रेत सहभाग नोंदवत आपल्या लाडक्या नेत्याला अश्रूभिनीत निरोप दिला. यावेळी सईद खान (प्रदेशाध्यक्ष, शिवसेना), ॲड. सुभाषराव राऊत, प्रा. नवनाथ वाघमारे, माजी आमदार माणिकराव आंबेगावकर, खासदार रामराव वडकुते, प्रा. रामप्रसाद थोरात, वंचित बहुजन आघाडी जालना जिल्हाध्यक्ष, श्रीकांत विटेकर (जि.प. उपाध्यक्ष, परभणी), नानासाहेब राऊत, प्रा. संतोष वीरकर (समता परिषद), अनिलराव नखाते, पप्पू घाडगे, सुभाष आबा कोल्हे, हवामान तज्ञ पंजाबराव डख, प्रा. तुकाराम साठे, पत्रकार पंडित सत्वधर झरीकर, रंजीत नाना गिराम, माजी जि.प. सदस्य दादासाहेब टेंगसे, माजी सभापती सदाशिवराव थोरात, एकनाथ दादा शिंदे, छगनराव भुजबळ यांचे पीए, रवी भाऊ सोनवणे आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# दिवा मुंब्रा परिसरातील अनधिकृत नळसंयोजनावर कारवाई



**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
अमित जाधव

**ठाणे :** ठाणे महापालिका कार्यक्षेत्रातील अनधिकृत सर्व्हिसि सेंटर व अनधिकृत नळसंयोजन खंडीत करुन पाणीपुरवठा बंद करण्याची मोहिम आयुक्त सौरभ राव यांचे आदेशान्वये सुरु करण्यात आली आहे. दिनांक १७ ते २२ एप्रिल २०२४ दरम्यान दिवा, मुंब्रा परिसरातील एकूण १०९ अनधिकृत नळ संयोजने खंडीत करण्यात आली आहे.ङ्ग दिवा साबेबाव कोकण रत्न दिवा महोत्सव मैदानाच्या बाजूला १५० मी.मी व्यासाच्या जलवाहिनीवरील इंची व्यासाचे १८ व इंची व्यासाचे ०४ अशी एकूण २२, वेताळपाडा येथील १०० मी.मी व्यासाच्या जलवाहिनीवरील इंची व्यासाचे एकूण ११, ग्लोबल स्कूलच्या पाठीमागे २०० जलवाहिनीवरील इंची व्यासाचे ०४ अशी एकूण ०९ , कोकण रत्न, दिवा महोत्सव मैदानाच्या बाजूला, साबेगाव १५० मी.मी व्यासाच्या जलवाहिनीवरील इंची व्यासाचे एकूण ०५, मुंब्रा ठाकूरपाडा येथील नाल्याच्या बाजूला इंची व्यासाची एकूण ०६ नळसंयोजने खंडित करण्यात आली असून पाणीपुरवठा खंडीत करण्यात आला आहे.ङ्ग वारेकर स्कूल जवळ, मुंब्रा देवी कॉलनी १०० मी.मी व्यासाच्या जलवाहिनीवरील इंची व्यासाची एकूण ०६, साबे गाव येथील नळसंयोजन खंडीत करुन पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे. तसेच येथील १०० मी. पी.व्ही.सी पाईप व १ मोटर जप्त करण्यात आली आहे. साबेगाव रेल्वे ट्रॅकच्या बाजूला ३०० मी.मी व्यासाच्या जलवाहिनीवरील इंची व्यासाचे एकूण ५० नळ संयोजन खंडित करण्यात आली असून ११५० मी.पी.व्ही.सी पाईप व ०२ मोटर जप्त करण्यात आल्या आहे. संपूर्ण शहरात अशा प्रकारची कारवाई सुरूच राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# शहर वासियांनी पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळावा

## उपविभागीय अधिकारी आदित्य कासार यांचे आवाहन

**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
अनिस शेख



**महान :** संपूर्ण अकोला शहर वासियांची वर्षभर पिण्याच्या पाण्याची तृष्णा तृप्ती करणाऱ्या महान धरणातील उपलब्ध असलेला जलसाठा आणि होणारा बाष्पीभवन लक्षात घेता अकोला शहर वासियांनी पिण्याच्या पाण्याचा वापर काटेकोर पने करून होणारा पाण्याचा अपव्यय टाळावा असे आव्हाहन पाटबंधारे विभागातील बोरगाव मंजू चे उप विभागीय अधिकारी आदित्य कासार यांनी केले आहे.ङ्गमहान धरणातील पाणी अकोला शहर,बोरगाव मंजू,मुर्तिजापूर शहर,अकोला एम आय डी सी,महान येथील मत्स्य बीज केंद्र आणि खांभोरा उन्नई ग्रामीण पाणी पुरवठा वरील येणाऱ्या ६४ लहान मोठी खेडी गावांना वर्षभर पिण्यास पाणी पुरवठा केला जात असतो.महान धरण हे अकोला शहर वासियांची जीवन रेखा मानल्या जाते.ङ्गगेल्या वर्षी पावसाळा चांगल्या प्रमाणात पडल्याने महान धरणाचा जलसाठा १००% वरती पोहोचला होता.त्या अनुषंगाने या वर्षी नदीकाठावरील परवाना धारक शेतकऱ्यांना ६ हजार ७०० हेक्टरवर रब्बी सिंचन करिता महान धरणातून नदीपात्रात पाणी सोडण्यात आले होते.तसेच महान धरण पाणलोट क्षेत्रातुन सुद्धा धरणामागील अनेक गावातील शेतकऱ्यांनि सुद्धा यावर्षी शेकडो एकरात रब्बी हंगामाचे पीक घेउन लाभ घेतला आहे. महान धरणात आज मीतीला ३४२.७० मीटर, २९.६३८ द.ल.घ.मी ३४.३२% एवढा जलसाठा उपलब्ध आहे.गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी आज मितीला ९% इतका जलसाठा शिल्लक आहे.ङ्गहवामान विभागाने दिलेल्या अंदाज माहितीनुसार आगामी पावसाळा कमी होणार असल्याचे सांगितले आहे. पुढील पावसाची बाब लक्षात घेऊन शहर वासियांनी पिण्याच्या पाण्याचा वापर काटकसरीने करणे गरजेचे आहे.तसेच भविष्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये या करिता पाण्याचा वापर काटकसरीने करून होणारा पाण्याचा अपव्यय टाळावा. सध्याच्या परिस्थितीत महान धरणातून शेतकऱ्यांना सिंचना करिता ३१ मार्च पासून पाणी सोडणे बंद करण्यात आले आहे.धरणातील उपलब्ध जलसाठा अकोला शहरासाठी आरक्षित ठेवण्यात आला असून खांभोरा उन्नई ग्रामीण पाणी पुरवठा वरील ६४ खेडी गावांना पिण्यासाठी मागणी नुसार आठ ते दहा दिवसांच्या कालावधीत धरणातील पाणी नदीपात्रात सोडल्या जात आहे. धरणाचे पाणी गेले मुख्य गेट (वक्रद्वार) खाली महान धरणाला एकूण १० गेट वक्रद्वार बसविलेली आहे.प्रत्येक गेट वक्रद्वार ची साईज १६ फूट उंच आणि ४० फूट लांब आहे.धरणाची पाणी पातळी दिवसेंदिवस कमी होत असल्याने आज रोजी धरणाचे पाणी मुख्य गेट वक्रद्वार पासून खाली सरकले असून धरणातील एकूण पाच व्हॉल्व पैकी एक व्हॉल्व आज रोजी पाण्यावरती उघडा पडला असून उर्वरित चार व्हॉल्व पाण्याखाली बुडलेले आहेत. धरणातील उपलब्ध जलसाठ्याकडे कार्यकारी अभियंता चिन्मय वाकोडे यांचे मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी बोरगाव मंजू चे आदित्य कासार, शाखा अभियंता संदीप नेमाडे, मनोज पाठक हे बारकाईने लक्ष ठेवून व्यवस्थित नियोजन करीत आहे.

# रोपवाटीका व कृषी दुकान तपासणी मोहिम

**दै.सेवाशक्ती टाईम्स.**
दिपक जैस्वाल



**जाफराबाद :** जाफराबाद तालुका कृषी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली २३ एप्रिल रोजी रोपवाटिका व कृषी दुकान तपासणी मोहीम राबविण्यात आली. यामध्ये शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे,भाजीपाला रोपे व खते मुबलक प्रमाणात मिळावे यासाठी प्रशासनाकडून तपासणी करण्यात आली. यावेळी ङ्गकृषी अधिकारी गुंनियंत्रण तालुका कृषी अधिकारी कार्यालय जाफ्राबाद यांच्याकडून भाजीपाला रोपवाटीका व कृषी सेवा केंद्राची मोहीम स्वरूपात तपासणी करण्यात आली. जाफ्राबाद तालुक्यातील शेतकरी यांना दर्जेदार बियाणे, खते खरीप हंगाम २०२६ साठी उपलब्ध व्हावे यासाठी मा. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जालना व तालुका कृषी अधिकारी जाफ्राबाद यांच्या मार्गदर्शना खाली तालुकातील भाजीपाला रोपवाटिका ची तपासणी करण्यात येत आहे. यामध्ये दुकानात ठेवलेल्या बियाण्यांचे बिले त्यांचे उगम, साठा, विक्री व रोपवाटिका ची परवानगी आहे का आधी बाबींची तपासणी करण्यात आली. यावेळी पथकामध्ये आर पी कस्तुरे कृषी अधिकारी (गुंनियंत्रण), एस जे काटकर मंडळ कृषी अधिकारी, जाफ्राबाद, पी आर वायाळ,श्रीमती मुळे, प्रदीप भोपळे आदि उपस्थित होते.

गाव तेथे वार्ताहर

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात

वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.

RNI - MAHMAR/२०२२/८७८८४

दैनिक सेवाशक्ती टाईम्स आपल्या हक्काचे दैनिक

या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.

✻ पात्रता ✻
१. समाजसेवेची आवड
२. जनसंपर्क
३. स्मार्ट फोन असणे आवश्यक
४. सोशल मीडियाचा वापर करता येणे

दैनिक सेवाशक्ती टाईम्स आपल्या हक्काचे दैनिक

Mo.86054 33822